# <u>गुरू पुजा दिवस गीत</u>

गुरूपुजा आहे ही खरी
चालुया SS गुरू वचना वरी
श्रद्धा प्रेम भक्ति ही खरी
चालुया गुरूवचना वरी...... ॥धृ॥

गुरू आमची माता, गुरू आमचा पिता
गुरू आहे सक्लांचा, भाग्य विधाता
सद्बोधाने जीवन उद्धरी
चालुया SS गुरू वचनावरी ......॥1॥

नको मोठेपणं, नको मी - तु -पण
सांगे माणसाला, हा माणूस बनं
मानवतेला जागु सत्वरी
चालुया SSS गुरूवचना वरी......॥2॥

नको मुखी निंदा, नको द्वेषभाव
असो ध्यानी मनी, एकत्वाचा भाव
सत्कर्म घडो परोपरी
चालुया SSS गुरूवचनावरी..........॥3॥

मनी ठेऊ आस, सदा राहो दास
समीप गुरूच्या, जीवन व्हावे खास
"परशुराम" अरदास करी
चालुया SSS गुरूवचनावरी.........॥4॥

**(चालः दिदि तेरा देवर दिवाना, हाय राम ..................)**